लोकमत

# राज्यसेवेच्या मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर; ४२५ उमेदवार मुलाखतीस पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्य सेवा मुख्य लेखी परीक्षेचा निकाल सोमवारी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. मुख्य परीक्षेतून ४२५ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत.

राज्यसेवेच्या १३९ विविध पदांसाठी परीक्षा घेण्यात आली आहे. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी नमूद केलेल्या पदांसाठीचा पसंतीक्रम त्यांच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन पद्धतीने लिंक खुली झाल्यापासून सहा दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्यांच्या मुलाखती मुंबईसह औरंगाबाद, नागपूर आणि पुणे किंवा अन्य केंद्रावर घेण्यात येणार आहे. मुलाखतीचा कार्यक्रम संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे.

Mumbai Main
Page No. 5 Dec 18, 2018
Powered by: erelego.com